पुण्य नगरी

# अहमदनगर महाविद्यालयात 'सायबर वॉरियर्स'चे विशेष प्रशिक्षण

## २० स्वयंसेवक सायबर सुरक्षेसाठी सज्ज

## 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' अंतर्गत उपक्रम

अहिल्यानगर : डिजिटल युगात वाढत्या सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी आणि समाजात सुरक्षिततेविषयी जागृती निर्माण करण्यासाठी एक मोठे पाऊल टाकण्यात आले आहे. 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या विशेष उपक्रमांतर्गत अहमदनगर महाविद्यालय येथील संगणक विभागाच्या सहकार्याने 'अहमदनगर सायबर वॉरियर्स'च्या २० स्वयंसेवकांसाठी एका विशेष प्रशिक्षण सत्राचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.



या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश स्वयंसेवकांना केवळ सायबर सुरक्षेचे तांत्रिक ज्ञान देणे एवढाच नव्हता, तर त्यांच्यातील व्यावसायिक कौशल्ये, व्यक्तिमत्त्व विकास, नेतृत्व क्षमता आणि सुप्त गुणांना वाव देऊन भविष्यातील जबाबदाऱ्यांसाठी सक्षम बनवणे हा होता. या महत्त्वपूर्ण उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अभिजित कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. दिलीप भालसिंग, उपप्राचार्य विलास नाबडे, संगणक विभागाचे प्रमुख रझ्झाक सर आणि रोजगार समन्वयक निवेदिता काळे यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले. या प्रशिक्षणामुळे सक्षम बनलेली ही २० सायबर वॉरियर्सची फळी आगामी काळात विविध सायबर जनजागृती उपक्रमांमध्ये सक्रिय भूमिका बजावणार आहे.

या सत्रात 'क्विक हील फाउंडेशन'चे दीपू सिंह यांनी मुख्य मार्गदर्शक म्हणून भूमिका निभावली. त्यांनी संवादात्मक उपक्रम, गटचर्चा आणि प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून स्वयंसेवकांना त्यांच्यातील क्षमतांची जाणीव करून दिली. प्रशिक्षणार्थींनी अत्यंत शिस्तबद्ध आणि उत्साही पद्धतीने यात सहभाग घेत सायबर संकल्पना, प्रभावी संवाद आणि सांघिक कार्यपद्धती यांसारखे गुण आत्मसात केले.

### भविष्यात व्यापक अभियानाचा संकल्प

» प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण झाल्याबद्दल अहमदनगर सायबर वॉरियर्सतर्फे महाविद्यालय प्रशासन, संगणक विभाग आणि क्विक हील फाउंडेशनचे आभार मानण्यात आले. प्रशिक्षित झालेल्या या स्वयंसेवकांच्या माध्यमातून आगामी काळात विविध शैक्षणिक संस्था आणि सामाजिक स्तरावर सायबर सुरक्षा जनजागृती अभियान अधिक व्यापकपणे राबविले जाईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.